# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

**दिनांक १७/०६/२०२४ (सोमवार) दुपार**

---

## अवैध रेतीची चोरटी वाहतुक करणाऱ्या आरोपीविरूद्ध गुन्हा नोंद
## वाहनासह एकुण १५,२४,०००/—रू. चा मुद्देमाल जप्त

दि. १६/०६/२०२४ रोजी मा. श्री. रमेश बरकते उपविभागीय पोलिस अधिकारी सा. रामटेक तसेच मा. पोलिस निरीक्षक प्रशांत काळे सा. यांचे मार्गदर्शनात पो.उप.नी. श्रीकांत लांजेवार, पो.ना. प्रफुल रंधई, पोना मंगेश सोनटक्के, पोशी धीरज खंते, शरद गीते असे पोलिस स्टेशन परिसरात पेट्रोलिंग करीत असताना मुखबिरद्वारे मिळालेल्या माहितीवरून तुमसर ते रामटेक रोडवरील उबंटू हॉटेल समोर ट्रक क्र. MH-34 BZ-3345 ला थांबून पाहणी केली सदर ट्रक चालक नामे अजजिदोदीन फिरोदोदीन वय ३२ वर्ष रा. पाटण पुरा झेंडा चौक अमरावती हा विनापरवाना अवैधरित्या रेती ची वाहतूक करताना मिळून आल्याने ट्रक चालक याच्या विरुद्ध अप. क्र. ४०७/२०२४ कलम ३७९, भादवी सह कलम ४८(७), ४८(८) महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम सहकमल ४, २१ खान खनिज अधी. सहकलम ३ सार्वजानिक मालमत्ता नुकसान प्रतिबंध अधिनियम अन्यवे गुन्हा नोद करुन आरोपीच्या ताब्यातून ट्रक क्र. MH-34 BZ -3345 की १५,००,०००/—रू. व ८ ब्रास रेती किंमती २४०००/—रू. असे एकूण १५,२४,०००/—रू. चा माल जप्त करण्यात आला.




## अवैध रेतीची चोरटी वाहतुक करणाऱ्या आरोपीविरूद्ध गुन्हा नोंद

## वाहनासह एकुण २०,३६,०००/—रू. चा मुद्देमाल जप्त

दि. १६/०६/२०२४ रोजी मा. श्री. प्रशांत काळे पोलिस निरीक्षक यांचे मार्गदर्शनात पो.उप.नी. श्रीकांत लांजेवार, कार्तिक सोनटक्के, पो.ना. प्रफुल रंधई मंगेश सोनटक्के, उमेश गाढवे, पोशी धीरज खंते, शरद गीते, योगेश कुयटे, सुनील हरकाल असे पोलिस स्टेशन परिसरात पेट्रोलिंग करीत असतात मुखबिरद्वारे मिळालेल्या माहितीवरून रामटेक ते मनसर रोडवरील वाहीटोला रेल्वे क्रॉसिंग जवळ ट्रक क्र. MH-40/BF-9558 ला थांबून पाहणी केली सदर ट्रक चालक नामे पवन कुमार शंकर लाल कहारा वय ३१ वर्ष राहणार भरदा जि. शिवनी हा विना परवाना अवैधरित्या रेती ची वाहतूक करता ना मिळून आल्याने ट्रक चालक याच्या विरुद्ध अप क्र. ४०८/२०२४ कलम ३७९, १०९ भादवी सहकलम ४८(७),४८(८) महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम सहकमल ४, २१ खान खनिज अधी. सहकलम ३ सार्वजानिक मालमत्ता नुकसान प्रतिबंध आधी.अन्यवे गुन्हा नोद करुन आरोपीच्या ताब्यातून ट्रक क्र. MH-40/BF-9558 की २०,००,०००/—रू. व १२ ब्रास रेती की. ३६०००/—रू. असे एकूण २०,३६,०००/—रू. चा माल जप्त करण्यात आला.



## खापरखेडा पोलीसांनी माउझर ठेवणा—या आरोपीस केले अटक

मागील काही दिवसापासुन खापरखेडा पोलीसांनी सतर्कतेमुळे पो.स्टे. खापरखेडा परिसरातुन ८ माउझर जप्त करण्यात आलेले आहे. काही दिवसाअगोदर खापरखेडा वार्ड क्र. ०१ चिचोली खापरखेडा येथे राहणारा अभिषेक अंहिसक पाटील याने किरकोळ भांडणात लोकांना भिती दाखविण्याचे उददेशाने एक देशी माउझर काढुन हवेत लहरविली होती. पोलीस स्टेशन खापरखेडा येथील डी बी पथकाला यांची चाहुल लागताच ठाणेदार धनाजी जळक यांनी सदरची माहीती मा. पोलीस अधिक्षक हर्ष पोद्दार व उपविभागिय पोलीस अधिकारी संतोष गायकवाड यांना देऊन वरिष्ठांचे आदेश घेऊन दिनांक १६/०६/२०२४ रोजी ठाणेदार धनाजी जळक यांनी डी. बी पथकासह स्वत:हा जावुन अभिषेक अहिसंक पाटील याला ताब्यात घेऊन सखोल विचारपुस केली असता अभिषेक पाटील याने सांगितले की, सदर माउझर त्याने आपला मित्र विधी संघर्ष बालक याचे घरी लपवुन ठेवलेली आहे. खापरखेडा येथील ठाणेदार धनाजी जळक व डी बी पथक हे पंचासह अभिषेक पाटील याने दाखविलेल्या घरात जावुन अभिषेक पाटील याने अलमारीतुन काढुन दिली. एक देशी बनावटी माउझर (अग्नीशस्त्र) किमंती ३०,०००/—रू ची मौक्यावर जप्त केले व आरोपी अभिषेक यास अधिक विचारपुस केली असता त्याने सदर माउझर शुभम उर्फ शेरू उईके रा. वार्ड क्र. २ चिचोली खापरखेडा याचेकडुन खरेदी केल्याचे सांगितले. पोलीसांनी अभिषेक अंहिसक पाटील रा. वार्ड क्र. १ चिचोली खापरखेडा कलम ३/२५, ५/२५ भारतीय हत्यार कायदा सहकलम १३५ मपोका अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला. फरार आरोपी शुभम उर्फ शेरू उईके व विधी संघर्ष बालक यांचा शोध सुरू आहे.

सदर कार्यवाही मा. पोलीस हर्ष पोद्दार सा., मा. अप्पर पोलीस अधिक्षक रमेश धुमाळ सा., उपविभागिय पोलीस अधिक्षक संतोष गायकवाड सा. यांचे मार्गदर्शनाखाली ठाणेदार धनाजी जळक सा., डी. बी. पथक येथील प्रफुल राठोड, शैलेश यादव, मुकेश वाघाडे, कविता गोंडाने, मुकेश वाघाडे, राजु भोयर, राजकुमार सातुर यांचे पथकाने पार पाडली आहे.



पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर